प्रेस नोट

दिनांक :– २८/०४/२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री.जगदीश देविदासराव बलोदे, वय – ४५ वर्ष, पद – वनपाल, उदखेड वर्तुळ, मोर्शि वनपरीक्षेत्र, अमरावती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | २८.०४.२०२३ चे १६/३५ वा. ते १६/५९ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | ६०००/– रूपये. तडजोडीअंती ३४००/– रूपये. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | ३४००/– रूपये. |
| ६ | घटनास्थळ | सहाय्यक वनपरीक्षेत्र अधिकारी उदखेड वर्तुळ कार्यालय, मोर्शी अमरावती. |

यातील तक्रारदार यांनी दिनांक २६/०४/२०२२ रोजी तक्रार दिली की, त्यांनी सौ.ज्योती यादवराव चोपडे रा.चिखल सावंगी ता.मोर्शी जि.अमरावती यांचे शेतातील ३६ सागवान चे झाड खरेदी करून सदर झाडाची कटाई परमिशन मिळण्याकरीता दिनांक ०६/०२/२०२३ रोजी वनपरीक्षेत्र अधिकारी (प्रा.) मोर्शी यांचे कार्यालय येथे अर्ज दाखल करून दिनांक ०३/०४/२०२३ रोजी वनविभागामार्फत कटाई करण्याची परवानगी प्राप्त केली होती. त्यानंतर त्यांनी परवानगीनुसार झाडाची कटाई करून दिनांक १७/०४/२०२३ रोजी वनपरीक्षेत्र अधिकारी (प्रा.) मोर्शी यांचे कार्यालय साग लाकडास वाहतुक परवाना मिळण्याकरीता विनंती अर्ज दाखल केला होता. त्यांनतर सदरचा विनंती अर्ज उदखेड वर्तुळ मोर्शी वनपरीक्षेत्र, अमरावती येथील वनपाल श्री.जगदीश बलोदे यांचेकडे पुढील कारवाई करीता प्राप्त झाला होता. त्यानुसार ते दिनांक १९/०४/२०२३ रोजी सहाय्यक वनपरीक्षेत्र अधिकारी उदखेड वर्तुळ कार्यालय, मोर्शी येथे परवानगी संबधाने विचारणा करण्याकरीता गेले असता त्यांना वनपाल श्री.बलोदे यांनी लॉगींग पंचनामा करून वनपरीक्षेत्र अधिकारी (प्रा.) मोर्शी यांचे कार्यालय प्रकरण पाठविण्याकरीता ६०००/– रू. लाचेची मागणी करीता असल्याबाबत लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि. २८/०४/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान वनपाल श्री.बलोदे यांनी लॉगीग पंचनामा करून वनपरीक्षेत्र अधिकारी (प्रा.) मोर्शी यांचे कार्यालय प्रकरण पाठविण्याकरीता ३,४००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

वरून पंचासमक्ष आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री.जगदीश देविदास बलोदे, वनपाल, उदखेड वर्तुळ, मोर्शी वनपरीक्षेत्र, अमरावती यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रूपये ३,४००/– पंचासमक्ष स्विकारली वरून आज रोजी आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रकिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.अरुण सांवत, अपर पोलीस अधीक्षक, मा.श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.संजय महाजन, पोलीस उप अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, श्री.एस.एस.भगत, पोलीस उप अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे **मार्गदर्शनाखाली पो.नि. केतन मांजरे, पो.ना. विनोद कुंजाम, पो.कॉ. वैभव जायले, आशिष जांभोळे ,चालक पो.उप.नि.सतीश किटकुले, यांनी पार पाडली.**

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती.
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५,२६६४९०२
टोल फ्रि नंबर – १०६४

(केतन मांजरे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
अमरावती
मो.नं. ९०२१३४१९६०